# प्रकरण पहिले
# संशोधन विषयाची ओळख


| प्रकरण क्रमांक | प्रकरणाचे शीर्षक | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| **प्रकरण पहिले** | **संशोधन विषयाची ओळख** | **१ ते १३, १४** |
| १.१ | प्रास्ताविक | १ |
| १.२.१ | संशोधन समस्येची पार्श्वभूमी | २ |
| १.२.२ | शैक्षणिक तंत्रविज्ञान अर्थ व मराठी लेखनकौशल्य | ३ |
| १.२.३ | शैक्षणिक तंत्रविज्ञान अर्थ व व्याख्या | ३ |
| १.२.४ | मराठी विषयाच्या लेखनकौशल्यामध्ये तंत्रविज्ञानाचा वापर | ५ |
| १.२.५ | शैक्षणिक तंत्रविज्ञान व शिक्षकाची भूमिका | ६ |
| १.२.६ | I] मराठीचे लेखनकौशल्य : एकनवा दृष्टीकोन, स्वयंसुधारपध्दती. | ६ |
| | II] लेखनातील त्रुटींची कारणे | ८ |
| १.२.७ | स्वयंसुधारपध्दती आणि तंत्रविज्ञान यांचा संबंध | ८ |
| १.२.८ | संशोधनाचे शीर्षक | १० |
| १.२.९ | संशोधनविषयात वापरलेल्या संज्ञाचा अर्थ | १० |
| १.२.१० | सारांशाने : संशोधनाची गरज व महत्व | १० |
| १.२.११ | संशोधनातील उद्दिष्ट्ये | ११ |
| १.२.१२ | संशोधनाची गृहितके | ११ |
| १.२.१३ | संशोधनाची परिकल्पना | १२ |
| १.२.१४ | संशोधनाची व्याप्ती व मर्यादा | १२ |
| १.२.१५ | संशोधन अभ्यासाचे संघटन व प्रकरण योजना | १३ |
| | **संदर्भ** | **१४** |

## प्रकरण पहिले

## - संशोधन विषयाची ओळख -

### १.१ प्रास्ताविक :-

अनुभव हा मानवाचा महान शिक्षक आहे. जीवनाच्या धकाधकीत प्रत्यक्ष भाग घेण्यातून , जबाबदारी उचलण्यातून व होणाऱ्या परिणामातून माणसाला जे जिवंत अनुभव मिळतात. त्यामुळेच माणूस शिकतो, शहाणा होतो. हा अनुभव विचारांच्या देवाणघेवाणीतून , मानव परिस्थितीतून , पर्यावरणातून , जसा व जेव्हा जेव्हा मिळेल तसाच प्रत्येक व्यक्तीला गोळा करावा लागतो. परंतु विद्यार्थ्यांस हेतुपुरस्पर व अर्थपूर्ण अनुभव मिळवून देणे हे उद्दिष्ट शिक्षण प्रक्रियेतून साधायचे असते. अर्थपूर्ण अनुभव हाच शिक्षणाचा पाया तर 'मातृभाषा' हेच शिक्षणाचे माध्यम होय.

आजच्या युगाने २१ व्या शतकात नुकतेच पदार्पण केलेले आहे. काळाची गरज आता नुसते साक्षर होवून चालणार नाही तर संगणक साक्षर व्हावयास पाहिजे. प्राथमिक शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण हा भारतासारख्या विकसनशील देशासमोर महत्वाचा विषय आहे. विज्ञान आणि तंत्र विज्ञानातील प्रगतीमुळे भौतिक समृध्दीचे एकेक दार देशासमोर खुले होत आहे. ह्या प्रगतीचा लाभ उठवून देशातील सामान्य जनाचे जीवनमान सुधारावे व सांस्कृतिक आकाक्षांची पूर्ती व्हावी. समता, स्वातंत्र्य , लोकशाही आणि सामाजिक न्याय ह्यांच्या आधारावर समाजाची उभारणी व्हावी, अशातऱ्हेने विकासाचे उद्दिष्ट भारतासमोर आहे. हे उद्दिष्ट साध्य करण्याचे महत्वाचे साधन म्हणजेच शिक्षण होय.

विकास प्रक्रियेत शिक्षकाचे अनन्यसाधारण स्थान आणि प्रत्यक्षातील निरुत्साही करणारी परिस्थिती या दोन्हीमुळे प्राथमिक शिक्षणाच्या कार्यावर सतत विचार होतो आहे. प्राथमिक शिक्षणातील प्रगतीसाठी अनेक नवनवीन उपक्रम राबवले जात आहेत. पण त्यात अनेक अडचणी येतात. उदा. देशातील गरिबी, पालकांची उदासिनता, कौटुंबिक अस्थैर्य, शिक्षणाबद्दलची अनास्था , शैक्षणिक यंत्रणेची अनुपलब्धता, पायाभूत सोयी सुविधांचा तुटवडा, आणि शिक्षकांमध्ये मनोदौर्बल्य , राजकीय इच्छाशक्तीचा अभाव,अशा अनेक कारणांनी प्राथमिक शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण होऊ शकलेले नाही. या बरोबर आणखी एक महत्वाचे कारण म्हणजे प्रत्यक्ष लेखनातील निरस, आनंदरहित, अनाकर्षक प्रक्रिया होय.

विद्यार्थ्यांच्या शिक्षणाची सुरुवात ही सर्वप्रथम 'घर' व 'आई' या शाळा व शिक्षकरुपी माध्यमातून होत असते. सर्वात अगोदर मूल जी भाषा बोलायला शिकते ती बोलीभाषा आपल्या आईकडूनच ,म्हणूनच ती मातृभाषा. पण जसे बोलतो. तसे लेखनीतून प्रकट करु शकत नाही अन् प्रकट करता आलेच तर शुध्द लिहू शकत नाही. त्यामुळे शिक्षण मनोरंजक न वाटता विद्यार्थ्यांचे अनुपस्थित राहणे, अभ्यासात अपयश येणे, असे मार्ग सुरु होतात. यातून मार्ग काढायचा म्हणजे शैक्षणिक क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर तंत्रविज्ञानाचा वापर करावयास हवा तसेच नवनवीन अध्ययन पध्दतीवर अवलंबून शिक्षण हे उत्साहवर्धक वाटण्यास मदत झाली पाहिजे हे सर्व साध्य करण्यासाठी व शिक्षण प्रक्रिया सुलभ होण्याच्या दृष्टीने लेखन कौशल्य विकसित करणे हेच महत्वाचे ठरते.

**१.२.१ संशोधन समस्येची पार्श्वभूमी :-**

स्वातंत्र्योत्तर काळात शैक्षणिक प्रगती बरोबर सर्व विषयांच्या बरोबरीने भाषा विषयास ही मोठेच महत्व प्राप्त झालेले आहे. मातृभाषा हे शिक्षणाचे माध्यम असल्याने अगदी पहिलीपासून ते भारतीय प्रशासक सेवा ( आय.ए. एस.) दर्जाच्या परीक्षापर्यंत मातृभाषेला अधिक महत्व प्राप्त झालेले आहे. मराठी भाषेचे अध्ययन करताना श्रवण, भाषण, वाचन ,आणि लेखन ही चार भाषिक कौशल्ये महत्वाची मानली जातात. परंतु आज विद्यार्थ्याला गणित, विज्ञान इ. विषयात चांगले गुण मिळतात. पण जी मराठी भाषा तो- बोलायला लागल्यापासून शिकत असतो. तिच्यामध्ये मात्र त्याला विशेष गुण मिळत नाहीत. ह्याचे कारण म्हणजे त्याची अभिव्यक्ती क्षमता, लेखनकौशल्य कमी पडते. वास्तविक प्राथमिक शाळेतूनच मराठी विषय हा सक्तीचा आहे. व एकूण १०० गुणांपैकी ३५% भाग लेखनविभागासाठी असतो. त्यामध्ये ५० गुणांचे प्रश्न व्याकरण व लेखन प्रकारासाठी, ५० गुणांचे प्रश्न गद्य- पद्य यासाठी विभागलेले असतात. त्यामुळे विद्यार्थ्यांना लेखनप्रकार ही योग्य पध्दतीने हाताळता आले पाहिजेत अशी अपेक्षा असते. त्यामुळे जे निबंध लेखन १५ गुण, सारांशलेखन- ५ गुण , गद्य- पद्य आकलन ७ गुण, पत्रलेखन ८ गुण , (व्याकरण १५ गुण) अशी विभागणी असते, म्हणजेच केवळ लेखन प्रकारासाठी ३५ गुण ठेवलेले असतात. या गुणापैकी कमाल गुण मिळण्यासाठी विद्यार्थ्यांचे लेखनकौशल्य तंत्र सुधारणे आवश्यक आहे.

## १.२.२ शैक्षणिक तंत्रविज्ञान व मराठी लेखन कौशल्य :-

इयत्ता १० वी पर्यंत मराठी भाषा सक्तीची असल्याने त्याचा अभ्यास काळजीपूर्वक करणे अनिवार्यच आहे. मातृभाषा म्हणून ही विद्यार्थ्यांनी मराठी भाषेच्या अध्यापनाकडे अधिक लक्ष देण्याची आवश्यकता वाटते. कारण त्यांच्या मराठी भाषेच्या अद्ययावत अध्ययन क्षमता पाहणे गरजेचे आहे. परंतु वाढती लोकसंख्या, शिक्षणाच्या अपुऱ्या सोयी व चुकीच्या पध्दती, भौतिक सुविधांचा अभाव, विद्यार्थ्यामधील बौध्दिक , सामाजिक आणि आर्थिक असमानता यामुळे मोठया संख्येने अध्ययन क्षमतेमध्ये तफावत असलेल्या विद्यार्थ्यांना शिकविणे जिकीरीचे झाले आहे. ज्ञानाच्या विस्फोटामुळे तर हे काम आणखी अवघड झाले आहे. अशावेळी पारंपारिक शिक्षण पध्दतीऐवजी शैक्षणिक तंत्र विज्ञानाचा वापर अध्यापनात करणे योग्य आहे. त्यामुळे मराठी विषयाच्या लेखन कौशल्यात भर पडू शकेल.

मराठी विषयांतील लेखन पध्दती हया स्वयंसुधार व मनोरंजक, सोप्या असणे गरजेचे आहे. यासाठी तंत्र विज्ञानाच्या सहाय्याने दृक श्राव्य साधनांचा वापर लेखनात करणे आवश्यक आहे.

## १.२.३ शैक्षणिक तंत्र विज्ञान : अर्थ व व्याख्या :-

शैक्षणिक तंत्र विज्ञान या संज्ञेमध्ये शिक्षण आणि तंत्र विज्ञान या दोन शब्दांचा संबंध आहे. शैक्षणिक क्षेत्रात मोठया प्रमाणावर तंत्र विज्ञानाचा उपयोग करायला हवा त्यासाठी त्याच्या व्याख्या पाहणे गरजेचे आहे.

"Educational technology is the systematic application of scientific or other organised knowledge of practical task"[I]

-Gal Braith.

गालब्रेथची ही व्याख्या शैक्षणिक शब्दार्थाशी मिळती जुळती आहे. कोणत्याही शास्त्रीय अथवा शिस्तबध्द ज्ञानाचा वापर करणे एवढाच अर्थ या व्याख्येवरुन प्रतीत होतो. यापेक्षा जी.ओ. लेथ यांनी केलेली व्याख्या ही आधिक अर्थपूर्ण वाटते.

"Educational technology is the systematic application of scientific knowledge about learning and conditions of learning to improve the effectiveness and efficiency of teaching and training."[II]

- G.O. Leith.

या व्याख्येवरुन शैक्षणिक तंत्रविज्ञानाचा उपयोग किंवा हेतू स्पष्ट होण्यास मदत होते. अध्ययन, अध्यापन व प्रशिक्षण यांची परिणामकारकता वाढविण्यासाठी शास्त्रीय ज्ञानाच्या उपयोगावर भर देण्यात आला आहे. अशाच आशयाची व्याख्या तिलकराज यांनी केलेली आहे. ते म्हणतात,

"Educational technology is the system which facilitates learning and make learning easy, effective , durable and compreherisive."[III]

या व्याख्येवरुन शैक्षणिक तंत्रविज्ञानाचे कार्य स्पष्ट होते. आय के. डेव्हीस यांनी शैक्षणिक तंत्रविज्ञानाच्या कार्यामध्ये आणखी भर घातलेली आढळते.

"Educational technology is concerned with the problem of education and training context and it is characterized by the organisation of resources of learning ."[IV]

- I. K. Devis.

डेव्हीस यांच्या व्याख्येनुसार शैक्षणिक तंत्रविज्ञानाचा संबंध हा शिक्षणातील समस्यांशी व प्रशिक्षणाशी येतो. त्याचप्रमाणे श्री. एस. एस. कुलकर्णी यांनी शैक्षणिक तंत्रविज्ञानाची व्याख्या वेगळ्या पध्दतीने मांडलेली आढळते.

"Edu cational technology may be defined as the application of the laws as well as recent discoveries of science and technology to the process of education"[V]

विज्ञान क्षेत्रात होणारी नवनवीन संशोधने व नवनवीन सिध्दांताचा शिक्षण प्रक्रियेत उपयोग करणाऱ्या शास्त्राला शैक्षणिक तंत्र विज्ञान म्हणता येईल.

**१.२.४ मराठी विषयाच्या लेखन कौशल्यामध्ये तंत्र विज्ञानाचा वापर :-**

आजचे युग विज्ञानयुग आहे. नित्य नवीन ज्ञान प्राप्त करण्याच्या दृष्टीने मानवाचे प्रयत्न अनादिकालापासून होत आलेले आहेत. मनुष्य आपल्या इंद्रियाव्दारे बाहेरच्या जगाशी फार मर्यादित संबंध प्रस्थापित करु शकतो. या मर्यादावर मात करण्यासाठी मानवाच्या ज्ञानेंद्रियांची कार्यक्षमता वाढविणाऱ्या साधनांची निर्मिती झाली त्याचा उपयोग मराठी विषयाच्या लेखन कौशल्यामध्ये होऊ शकतो. ज्या ठिकाणी साधनाअभावी अध्यापन क्षमता कमी पडते त्या ठिकाणची कमतरता थोडया फार प्रमाणात शैक्षणिक तंत्र विज्ञान भरुन काढू शकते.

सध्या वाढत्या लोकसंख्येमुळे एका वर्गात एकावेळी पन्नाससाठ विद्यार्थी असतात. त्यांना शिकविणारे शिक्षक केवळ स्वत:च्या विषयांतच तज्ज्ञ असतात. एवढेच नव्हे तर शिकविण्याची हातोटी त्यांना साधलेली असते. त्यांचा लाभ सर्वच विद्यार्थ्यांना होऊ शकत नाही. जर अशा शिक्षकांचे नियोजनपूर्वक व साधन सामुग्रीयुक्त वर्गात सादर केलेले पाठ व्हिडीओ टेपवर मुद्रित करुन घेतले तरच ते शक्य होईल यातून लेखन कौशल्या संबंधीचे मार्गदर्शनही देता येईल.

**१.२.५ शैक्षणिक तंत्र विज्ञान व शिक्षकाची भूमिका :-**

आपले अध्यापन व विद्यार्थ्यांचे अध्ययन अधिकाधिक प्रभावी होण्यासाठी, नवनवीन साधनांचा, तंत्राचा व पध्दतीचा विकास होणेसाठी, शैक्षणिक तंत्र विज्ञानात शिक्षकाची भूमिका महत्वाची आहे. यात कसल्याही प्रकारची शंका-कुशंका रहात नाही.

कोणतीही भिती निराधार असते. अनुभव समृध्दतेचा फायदा मिळवण्याची क्षमता मुलांमध्ये शिक्षकाशिवाय येऊ शकत नाही. शैक्षणिक तंत्र विज्ञानाच्या मदतीने तो फायदा मुलांना दयावा. शैक्षणिक तंत्र विज्ञानाने शिक्षकांची जबाबदारी कमी होत नाही तर त्यांची व्यक्तिगत मदत आवश्यक ठरते. स्वतंत्र, आत्मनिर्भर नागरिक बनविण्याचे श्रेय शिक्षकांकडे जाते. अशाप्रकारे शिक्षण क्षेत्रात गती व परिणामकारकता आणण्यासाठी शैक्षणिक तंत्र विज्ञानात शिक्षकाची भूमिका अचूक हवी. तिच्या सहाय्याने संपूर्ण शालेय कामकाजाचे मूल्यमापन करण्यासाठी यंत्रणा विकसित करणे व लेखनातील पध्दतीमध्ये फेरबदल करणे शक्य आहे.

## १.२.६ मराठीचे लेखन कौशल्य नवा दृष्टीकोन :-

**१) लेखन स्वयंसुधार पध्दती म्हणजे नेमके काय ?**

सहामाही, वार्षिक परिक्षेच्यावेळी विद्यार्थी वर्गाकडे मराठीचा पेपर सोडवतांना लेखनात उदासिनता आढळून येते. त्यांना त्या प्रश्नांचे महत्व नीट समजलेले नाही. वेळ व लेखन यांची सांगड ते व्यवस्थित घालू शकत नाहीत. मराठी विषयाचा अभ्यास कठीण आहे अशी त्यांची मानसिकता झालेली आहे. पाठय पुस्तक योग्य नाही. मराठी विषयाचे प्रश्नांचे उत्तर कितीही लिहीले तरी जास्त गुण मिळत नाहीत, असा विद्यार्थ्यांचा समज झालेला आहे, असे दिसते. म्हणूनच या सबंधी संशोधकाने प्रत्यक्ष अध्यापन करीत. . .

विद्यार्थ्यांच्या प्रतिक्रिया समजावून घ्याव्यात. प्रत्यक्षात घटकचाचण्या, स्वाधायलेखन, सत्र I व II परिक्षा इ. परीक्षेच्या उत्तरपत्रिका तपासतानाही अनुभव घेतला असता विदयार्थ्यांना ठराविक प्रश्नांच्या उत्तर लेखनास कमी गुण पडतात. याचा अनुभव संशोधकास आला. त्यावेळी संशोधकास आढळले की, विद्यार्थ्यांना मराठी विषयातील प्रश्नांची उत्तरे नीट लिहिता येत नाहीत, व्याकरणाचा प्रश्न सोडविणे जमत नाही, त्यांना संधी व समास यातील फरक चटकन लक्षात येत नाही, ऱ्हस्व- दीर्घ अक्षरे ओळखता येत नाहीत. अक्षरगणवृत्ते, व मात्रावृत्ते यामधील फरक लक्षात येत नाही. गण पाडणे लगक्रम लिहणे , गण ओळखणे किंवा यती ओळखणे आणि मात्रावृत्तातील मात्रालेखन करणे जमत नाही. वाक्यातील शब्दांचे व्याकरण चालविणे तर कर्मकटकट वाटते वाक्य प्रकाराऐवजी अर्थाचाच वापर करताना आढळतात. याचाच अर्थ असा की त्यांना प्रश्नाचा नेमका अर्थ कळत नाही. पत्रलेखनाचा औपचारिक आणि अनौपचारिक पत्रलेखनप्रकार कितीही सरावाने त्यांच्या अंगवळणी पडत नाही. गद्य- पद्य आकलन होत नसल्याने त्यातील ओळी जशाच्या तशा उद्धृत केल्या जातात. सारांशलेखनाच्या बाबतीतही हीच गोष्ट आढळते. निबंधलेखनाच्या मागील मूल समस्या ही आहे की, विद्यार्थ्यांच्या स्वतंत्र अभिव्यक्तीला वाव नाही, विचारांना वाव नाही, आपल्याला स्वतःला आपले असे काही सांगावयाचे आहे हे ही ते विसरुन जातात. आणि मग निबंधलेखन हा एक टाळण्याचा प्रकार मुलांच्याकडून होतो. खरे तर क्रमिक पुस्तकातील विचार भाषासौंदर्य वाङ्मय प्रकार त्यांच्या पचनी पडले आहे, की नाही , हे पारखण्याची जागा आहे. निबंधलेखन आणि हे लेखनकौशल्य अध्यापनातून मुलांच्या गळी उतरवण्याचे काम आहे, अध्यापकाचे यासाठीच संशोधकाने स्वयंसुधार पध्दतीचा वापर करुन विद्यार्थ्यांच्या लेखनकौशल्यांवर होणाऱ्या परिणामांचा अभ्यास करणेचे ठरवले आहे. त्यांना लेखनकार्यात काय अडचणी आहेत? त्यांच्यातील ह्या अडचणी आणि भिती दूर करण्यासाठी ही स्वयंसुधार पध्दती आहे.

एकदा का विद्यार्थ्यांच्या मनातील लेखनासंबंधीच्या समस्यांची भीती दूर झाली की मुले लेखनकौशल्य हळूहळू आत्मसात करु शकतील. या पध्दतीत लेखन दारिद्र्याची कारणे कोणती आहेत? ती शोधून ती दूर करण्याचा आटोकाट प्रयत्न केला जाणार आहे.

**१.२.६ (II) लेखनातील त्रुटींची कारणे :-**

**१) वाचन :-** एकूणच भाषिक अभावाचे कारण, जसे जितके आणि जे विद्यार्थ्यांनी वाचायला हवे तेवढे ते वाचत नाहीत. शहरात त्याचे प्रमुख कारण दूरदर्शन, शिकवण्या , क्लासेस, इंद्रजाल, वेताळ सारखी नुसती बघण्याची कॉमिक्स हे आहे. तर खेड्यात वाचनालये आणि पुस्तकांचा अभाव.

**२) अवधानः-** त्यावर उपाय म्हणून भाषेच्या क्रमिक पुस्तकांचा तरी भरपूर लाभ उठवायला हवा, तर तिथे आम्ही धडे, कविता यावरची ढोबळ प्रश्नोत्तरे यातच अडकलेले असतो. मग क्रमिक पुस्तकांतले सुंदर विचार , कल्पना; याकडे विद्यार्थ्यांचे लक्ष वेधून यांचे संक्रमण त्यांच्या भाषेत कसे करता येईल? याकडे लक्ष दिले जात नाही.

**३) अनुभवः-** वेगवेगळे अनुभव जागृतपणे घ्यायचे ते आपल्या मेंदूच्या संगणकाकडे व्यवस्थित ठेवायला द्यायचे आणि मग हव्या त्यावेळी त्यांचा योग्य उपयोग करायचा याचे शिक्षण मिळत नाही.

**४) मौखिक अभिव्यक्तीः-** याशिवाय त्यांना स्वतःचे काही सांगायचे आहे, याची दखल आम्ही घेत नाही.

एकूणच काय, अवांतर वाचन नाही, भाषेच्या क्रमिक पुस्तकाचा लेखनकौशल्य वाढवण्यासाठी प्रयोग करणे नाही, सभोवतालच्या जगाकडे जाणीवपूर्वक लक्ष नाही, निरीक्षण नाही. त्यामुळे भरभरुन बोलण्यासाठी विविध विषय नाहीत. शब्दसंपत्ती नाही. वाचनातून मिळणारी माहिती नाही, आणि शब्दसामर्थ्य नाही, त्यामुळे मुलांची लिखित/ मौखिक अभिव्यक्ती विकसितच होत नाही.

या सर्व लेखन दारिद्र्यावर मात करुन विद्यार्थ्यांच्या भाषिक कौशल्याला वाव देणारी पध्दती म्हणजेच "लेखनस्वयंसुधार पध्दती होय."

**१.२.७ स्वयंसुधार पध्दती आणि तंत्रविज्ञान यांचा संबंध :-**

कुठल्याही समारंभाची कार्यक्रमाची यशस्विता परिपूर्ण अशा नियोजनावर अवलंबून असते. तसेच स्वयंसुधारपध्दतीसाठी सर्वकष विचार करुन केलेली पूर्वतयारी अत्यावश्यक असते. प्रवासाला जाण्यापूर्वी आपण पूर्वतयारी करतो आणि आयत्या वेळेचा गोंधळ, निराशा, ताणतणाव, कटकट टाळतो वर्षभराचा सातत्याने केलेला अभ्यास, प्रश्नपत्रिकांचा सराव ही परिक्षेत हमखास यश मिळवण्यासाठी केलेली जोरकस पूर्वतयारीच असते. तंत्रज्ञानाचे ही तसेच असते.

एखादी कलाकुसरीची वस्तू तयार करताना सुरुवातीस छोट्या-मोठ्या, विविध आकाराच्या रंगाच्या वस्तू आपण गोळा करतो आणि मग कल्पकतेने त्यांची आकर्षक मांडणी करुन , कलात्मकतेची, कलाकुसरीची जोड देवून त्या सर्वांचा सुरेख मेळ साधत एक नवी नयनवेधक वस्तू बनवितो. त्या बनविताना येणाऱ्या समस्या सोडवण्यास शैक्षणिक तंत्रज्ञान मदत करते शिक्षणाचा नवा दृष्टीकोन देत थोड्यावेळात अधिक ज्ञान देवून अभ्यासक्रम वेळेत कसा पूर्ण करावा? याची तंत्रे शिकविते.

स्वयंसुधारपध्दतीव्दारा घरबसल्या श्रवण, वाचन संभाषण, अवलोकन,मनन , चिंतन या सहा गोष्टीमुळे आपली लेखनकला हळूहळू विकसित करता येते. यासाठी आत्मविश्वास हवा. समर्थ रामदासांचा "दिसामाजी काहीतरी लिहित जावे,प्रसंगी अखंडित वाचीत जावे ". हा आदेश शिरोधार्य मानून पाठ्यपुस्तकांखेरीज इतर खूप पुस्तकांचे वाचन समजून उमजून करायला हवे. हे करताना त्यातील नावीन्यपूर्ण शब्द ,त्यांचा अर्थ, त्यांचा वाक्यात प्रयोग , ह्या बाबी स्वयंसुधारपध्दतीतून शिकता येतील.

वाचनाने स्मरणशक्ती धारदार, बलदंड बनते. वयोगटानुसार वाचनाचे प्रसंग निवडावेत व चिकित्सक बुध्दीने आपले अनुभवविश्व वाढवून ते जास्तीत जास्त समृध्द करावे. त्यासाठी प्रचार,प्रसार माध्यमांचा वापर करावा लागेल. उदा. दूरदर्शन, आकाशवाणी , व्हिडिओ, संगणक, चित्रपट, नाटक जाहिराती, साप्ताहिके, पाक्षिके ,मासिके बातम्या , वर्तमानपत्रे, पोस्टर्स, प्रसंगनाट्य, पथनाट्य, कात्रणे, उत्सव, धर्मस्थळे, व्हीडीओ, नाटक , काचफलक, वार्ताफलक इ.च्या आधारे स्वयंसुधार पध्दती विकसित करता येईल.

थोडक्यात, कल्पनेची भरारी, अनुभवांची समृध्दी, विचारशक्तीत गती या साऱ्यांतून संभवतो स्वयंसुधार पध्दतीचा अविष्कार, यासाठी **संशोधकाने मराठी विषय-लेखनातील चुका टाळणेसाठी स्वयंसुधार पद्धतीचा अभ्यास करण्याचे ठरवले.** सध्या सेवांतर्गत प्रशिक्षणातून हे बऱ्याचअंशी कार्य सुरु आहे पण काही ठिकाणी साधनाअभावी ही अध्यापनक्षमता कमी पडते ही कमतरता थोड्या फार प्रमाणात शैक्षणिक तंत्रविज्ञान भरुन काढू शकेल त्यादृष्टीने संशोधन करण्यासाठी संशोधिकेने हा विषय निवडला आहे.

**१.२.८ संशोधनाचे शीर्षक :-**

"मराठी विषयाच्या लेखनातील स्वयंसुधार पध्दतीचा विद्यार्थ्यांच्या लेखनकौशल्यावर होणाऱ्या परिणामांचा अभ्यास."

**१.२.९ संशोधन विषयात वापरलेल्या संज्ञाचा अर्थ :-**

**१) लेखन :** अंतर्भूत परिच्छेद, कथा, निबंध , पत्र व संवाद लेखन इत्यादी स्वतंत्र अभिव्यक्तीला , विचारांना वाव देणारा घटक :-

"एखाद्या गोष्टीबाबत घटनेबाबत , विद्यार्थ्यांनी व्यक्त केलेली स्वतःची मते, दृष्टीकोन विचार व आत्मप्रकटीकरण."

२) **स्वयंसुधार पध्दती** ("Self Correction method" ):-

"स्वतः चुका शोधून त्यात दुरुस्ती करुन लेखनाच्या मूल्यमापनात शिक्षकांनी दर्शविलेल्या शुध्दलेखन , वाक्यरचना , विचारांची मांडणी, सुसंगतपणा , ओघ इत्यादी त्रुटी विद्यार्थ्यांनी स्वतः करण्याची पध्दती म्हणजे स्वयंसुधार पध्दती होय."

**३) लेखन कौशल्य :-**

"एखाद्या गोष्टीबाबत , घटनेबाबत विद्यार्थ्यांची विचार व्यक्त करण्याची हातोटी."

**४) परिणाम :-**

"लेखनातील विविध घटकामध्ये विकसित केलेल्या चाचणीमध्ये विद्यार्थ्यांनी संपादन केलेले गुण."

**१.२.१० संशोधनाची गरज व महत्व :- सारांशाने**

आधुनिक वाङ्‌मयात लेखनाचा फार मोठा सहभाग आहे. संशोधक ग्रामीण भागातील माध्यमिक शाळेमध्ये अध्यापन करीत असल्याने त्याने ही दुरावस्था जवळून अनुभवली आहे. ग्रामीण भागातील विद्यार्थी मराठी विषयाची उत्तरपत्रिका लिहित असताना , लेखनातील पुनरावृत्ती, प्रश्न उतरवण्याची सवय, पत्र, निबंध यातील मजकूर , भाषाशैली इ. गोष्टीकडे होणारे दुर्लक्ष, या सर्व चुका टाळण्यासाठी काही स्वयंसुधारपध्दती राबविणे आवश्यक आहे. त्या दृष्टीने हे संशोधन महत्वपूर्ण आहे.

**महत्व :-**

i] शाळेत विषयाच्या लेखनविभागातील आकलनासाठी पुरेसावेळ नसतो. विद्यार्थ्यांच्या स्वतंत्र अभिव्यक्तीला व विचाराना वाव मिळत नाही. आपल्यांला स्वतःला आपलेअसे काही सांगावयाचे आहे. हे ही ती विसरुन जातात मग लेखन टाळण्याची वृत्ती जडते. ती वाढवण्याकडे लक्ष द्यावे.

ii] लेखनासाठी आवश्यक असणाऱ्या विचारांचे, कल्पनांचे, भाषेचे आणि अनुभवांचे दारिद्र्य होय. लेखनाची उपयुक्तता व गरज विद्यार्थ्यांच्या लक्षात आणून देवून त्यांच्या निर्मितीक्षमतेला वाव मिळवून द्यायला हवा.

iii] सध्या अवांतर वाचन करणे, भोवतालच्या जगाकडे जाणीवपूर्वक लक्ष देवून निरिक्षण करणे शब्दसंपत्ती वाढवणे आवश्यक आहे.

यासाठी स्वयंसुधार पध्दती वापरणे योग्य **आहे**

### १.२.११ संशोधनाची उद्दिष्टये :-

i] विद्यार्थ्यांच्या लेखनविषयक कौशल्यातील सद्यस्थिती अजमावणे.

ii] लेखनाच्या मूल्यमापनासाठी उपयोगात आणलेल्या पध्दतीचा आढावा घेणे

iii] मूल्यमापनाच्या स्वयंसुधार पध्दतीचा तपशील , सांकेतिक चिन्हे, निश्चित करणे.

iv] स्वयंसुधार पध्दतीचा विद्यार्थ्यांच्या लेखनकौशल्यावर होणारा परिणाम अभ्यासणे.

v] स्वयंसुधार पध्दतीविषयी विद्यार्थ्यांचा दृष्टीकोन अभ्यासणे.

### १.२.१२ संशोधनाची गृहितके :-

१) भाषा अध्ययनात लेखनविभागासाठी १ / ३ महत्वांश दिलेला आहे.

२) लेखनासाठी वर्गाच्या पटानुसार -

५० च्यावर पट असल्यास - वार्षिक - २४ स्वाध्याय तर

५० च्याआत पट असल्यास - वार्षिक - ३० स्वाध्याय असे नियोजन केले जाते.

३) लेखनाच्या तपासणीसाठी एक आड एक स्वाध्याय तपासले जातात.

४) त्याचे सूक्ष्म म्हणजे गुण देणे व स्थूल म्हणजे Seen तपासणे असे दोन प्रकारे मूल्यांकन केले जाते.

५) स्वाध्यायासाठी सूक्ष्म स्वाध्यायात निबंध लेखनाचे प्रकार दिले जातात.

६) स्वाध्यायासाठी स्थूल स्वाध्यायात पत्र, कथा, कल्पनाविस्तार व आकलन, सारलेखन इ. चा. अंतर्भाव केला जातो.

७) लेखन तपासणीसाठी विविध पध्दतीचा वापर केला जातो.

**१.२.१३ संशोधनाची परिकल्पना :-**

**अ) शून्य परिकल्पना :-**

पारंपारिक पध्दतीने विषयांचे अध्यापन केलेल्या विद्यार्थ्यांच्या संपादनात आणि स्वयं सुधार पध्दतीने विषयाचे अध्यापन केलेल्या विद्यार्थ्यांच्या सरासरी संपादनात लक्षणीय फरक नसतो.

ब) १) पूर्व चाचणी मध्ये नियंत्रित व प्रायोगिक गटातील विद्यार्थ्यांच्या संपादणूक पातळीमध्ये लक्षणीय फरक आढळत नाही.

२) सांकेतिक चिन्हांचा वापर करण्याच्या उपक्रमाव्दारे विद्यार्थ्यांच्या चुका कमी होण्यास मदत होते.

३) विराम चिन्हांची ओळख व वापर यातून विद्यार्थ्यांच्या बुध्दीला चालना मिळते.

४) शब्द भांडाराच्या खेळातून बौध्दीक/सृजनात्मक विकासावर परिणाम होतो.

५) प्रायोगिक व नियंत्रित गटातील विद्यार्थ्यांच्या अंतिम चाचण्यांमधील गुणांच्या संपादणूक पातळीमध्ये लक्षणीय फरक आढळतो.

या परिकल्पनांची पडताळणी, स्वीकारार्हता, त्याज्यता व त्यांचे निष्कर्ष प्रकरण ४ मध्ये नमूद केले आहेत.

**१.२.१४ संशोधनाची व्याप्ती व मर्यादा :-**

अ) १) संबंधित संशोधन न्यू इंग्लिश स्कूल, चरेगांव या विद्यालयातील इयत्ता ९ वी च्या अ/ब या दोन तुकडयामधील प्रत्येकी ३०/३० अशा एकुण ६० विद्यार्थ्यांसाठी आहे.

२) अभ्यासक्रमातील लेखन प्रकारापैकी - निबंध, पत्र, सार लेखन, संवाद, कल्पना विस्तार हे घटक विचारांत घेतले आहेत.

३) स्वयं सुधार पध्दतीपैकी सांकेतिक कोड पध्दतीचा वापर केला आहे.

**मर्यादा :-**

सध्याच्या लेखन स्वाध्याय तपासण्याच्या पध्दतीत बदल करुन स्वयं सुधार पध्दतीचा वापर करण्याच्या घटकांपुरते मर्यादित आहे. प्रस्तुत संशोधनामध्ये चुका शोधून त्यावर लाल रंगाच्या शाईने गोल करणे, तो शब्द पुन्हा लिहणे हा भाग वगळलेला आहे.

**१.२.१५ :- संशोधन अभ्यासाचे संघटन व प्रकरण योजना :-**

संशोधनासाठी निवडलेल्या इयत्ता ९ वी व्या विद्यार्थ्यांचे प्रायोगिक व नियंत्रित गटामध्ये - वर्णानुक्रमे यादृच्छिक पध्दतीतील लॉटरी पध्दतीनूसार अ/ब तुकडीतील विद्यार्थ्यांचे सहामाही परिक्षेतील मराठी विषयाचे गुण व कालिक वय यांतील समानतेवरुन वर्णानुक्रमे २५-२५ चे दोन गट तयार केले चाचणी देऊन मूल्यमापन केले. व संख्याशास्त्रीय परिणामांनी अचूक निष्कर्ष काढले त्याचे पध्दतशीर अहवाल लेखन खालीलप्रमाणे केले आहे.

| | |
|---|---|
| प्रकरण पहिले : | संशोधनाची पार्श्वभूमी, संशोधन विषयाची ओळख, उदिदष्ठये, गृहितके, परिकल्पना, व्याप्ती, मर्यादा, पारिभाषिक व्याख्या इ. |
| प्रकरण दुसरे : | संबंधित साहित्याचा अभ्यास. |
| प्रकरण तिसरे : | संशोधनाची कार्यपध्दती. |
| प्रकरण चौथे : | माहितीचे संकलन, विश्लेषण व विशदीकरण. |
| प्रकरण पांचवे : | सारांश, निष्कर्ष व शिफारशी. |

## संदर्भ

जगताप ह. ना. - प्रगत शैक्षणिक तंत्रविज्ञान आणि माहिती तंत्रविज्ञान.
( नूतन प्रकाशन, पुणे ) पृष्ठे १६,१७

ओक सुमन - शैक्षणिक तंत्रविज्ञान
( श्री. विद्या प्रकाशन, पुणे) पृष्ठे १६४

पाटील लिला - शिक्षण घेता - देता.
( उन्मेश प्रकाशन, पुणे ) पृष्ठे १८०